नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी व इतर
निशाणी क्र. ७७

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १० यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - गोरखनाथ योगाजी डाखोडे

**वय** - ३४ वर्ष, **पद** - वनरक्षक

**नेमणूक** - खापा रेंज, तह. सावनेर, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत.**

घटनेच्या वेळी माझी पोस्टींग बडेगावला वनरक्षक या पदावर होती. दि. १४.०३.२०२५ रोजी वनपरिक्षक अधिकारी खापा एस.जी. आठवले यांचा मला फोन आला की मौजा सिरोंजी, भनगाळा नाला येथे वाघासारखा दिसणारा वन्य प्राणी मृत अवस्थेत मोक्का स्थळी आहे. तरी तुम्ही लवकर मोक्का स्थळी पोहचा. मी व एस. आर. शेलार, वनरक्षक गाडीवर बडेगाववरून अंदाजे दुपारी ३.०० वाजता मोक्का स्थळी गेलो असता सदर ठिकाणी वन्य प्राणी वाघ हा मृत अवस्थेत आढळून आला. वाघाची पाहणी केली असता त्याचे चारही पंजे गायब असल्याचे दिसून आले, तसेच वाघाचे दात व मिशा गायब होत्या. त्यानंतर आम्ही भोवताली पाहणी केली असता सेंटरिंग तारेला लावलेल्या ८ खुंटया व ११ के.व्ही. वायरवर टाकलेला आकोडा दिसला व ते जमा करण्यात आले. मला एम.ओ. क्र. ८ वरील सेंटरिंग तार दाखवण्यात आली. ती तीच आहे. मला एम.ओ.क्र.२ वरील खुंटया दाखवण्यात आल्या. त्या त्याच आहेत.

२. आजूबाजूला पाहणी केली असता घटनास्थळापासून २५० मिटरवर जाळलेल्या खुराटया दिसल्या. घटनास्थळाच्या पूर्वेला गजानन बाजनघाटे यांची शेती, पश्चिमेला बाबाराव ढोकणे यांची शेती व दक्षिण व उत्तर दिशेला नाला होता. गडलिंगे यांनी घटनास्थळ पंचनामा केला. मला नि.क्र. ७५ वरील मोक्का पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचांची नावे

अतूल बंडूजी तुपट व राकेश राजू मसराम अशी होती. पंचनामा अंदाजे सायंकाळी ४.०० वाजता सुरू झाला व सायंकाळी ५.३० वाजता संपला.

**न्यायालयाची मध्यांतराची वेळ झाल्याने पुढील सरतपास दुस-या सत्राकरिता तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE Date: 2026.04.09 16:48:11 +0530

सावनेर, (एस. एम. गाडे)
दिनांक ०९.०४.२०२६ **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १० यांचा सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत शपथेवर सुरू</u>.**

**३.** दि. १४.०३.२०२५ रोजीचा मोक्का पंचनामा दुपारी ३.०० वाजता सुरू करण्यात आला. त्याकरिता दोन पंच बोलावले. माझ्या सोबत एन.आर. गिरी, वनरक्षक बिछवा व के.डी. कुकलारे, वनरक्षक खुबाळा हजर होते. अशी चार चमू बनवण्यात आले. त्यापैकी एक आमची होती. मोक्का स्थळापासून ५०० मिटरच्या परिसराचे निरिक्षण करण्यात आले. मोक्का स्थळापासून २५० मिटर अंतरावर खुराटयाचा जाळ आढळून आला व सदर जागा उखरलेली दिसून आली. त्या परिसरात ८ सागाच्या खुंटया दिसून आल्या. पंचांना पंचनामा वाचून दाखवण्यात आल्या. पंचांची नावे गजानन मधुकर कोल्हे व श्रीपद चंद्रभान टेकाम होती. सदरचा पंचनामा मी नोंदवला. मला तो दाखवण्यात आला. त्यावर माझी, पंचांची, एन.आर. गिरी, वनरक्षक बिछवा व के.डी. कुकलारे, वनरक्षक खुबाळा यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो नि.क्र. ६० वर आहे. मी आरोपींना ओळखतो. ते विडीओ कॉन्फरेंसिंगद्वारे हजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. जे. एच. शेंडे यांचेमार्फत</u>**

**४.** मी दि. १४.०३.२०२५ रोजी हजर असल्याबाबत दैनंदिनी प्रकरणात दाखल केली नाही. नि.क्र.७५ वरील पंचनामा हा श्वान पथकाबाबत आहे व नि.क्र. ६० वरील पंचनामा हा चौकशी बाबतचा आहे. श्वान पथकासोबतची चौकशी दुपारी ३.०० वाजता सुरू झाली व सायंकाळी ५.०० वाजता संपली. नि.क्र.७५ वरील पंचनामा दुपारी ३.०० वाजता सुरू झाला व सायंकाळी ५.०० वाजता संपला. परिसर हा ५०० मिटरचा होता. श्वान पथकासोबत करण्यात आलेला पंचनामा जसे निरिक्षण होईल तसे लिहिण्यात आला. शेकाटी घटनास्थळाच्या उत्तरेला २५० मिटरच्या अंतरावर होती व ती श्वान पथकाने दाखवली. हे म्हणणे खरे आहे की, बांबूच्या ८ खुंटयांची लांबी पंचनाम्यात लिहिलेली नाही. सेंटरिंग तारेचा गुंडाळा किती लांब होता हे मोजले नाही. घटनास्थळाच्या पूर्व दिशेला बाजनघाटे यांचे शेत आहे, यांची चौकशी मी केली. माझ्यासमक्ष चनकापूरे बाबराव ढोकणे सोबत बोलले. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांसोबत बोललो नाही. पंच दुपारी ३.०० वाजता आले. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा न वाचता सही केली. पंचांचे आधार कार्ड प्रकरणात दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाजनघाटे व ढोकणे यांच्या शेताचे ७/१२ उतारे प्रकरणात दाखल केले नाही.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ६० वरील पंचनाम्याकरिता मी हजर नव्हतो. नि.क्र. ६० वरील पंचनामा मी स्वत: लिहिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६० वरील पंचनामा करतांना श्वान पथक नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, श्वानाने वरील मुद्देमाल दाखवल्याने आम्ही तो पंचनाम्यात नमूद केला. पंचनाम्यातील पोर्शन मार्क ब मला वाचून दाखवण्यात आला. तो खरा आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ६० वरील पंचनामा मी कार्यालयात बसून लिहिला. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना कार्यालयात बोलावून त्यांची पंचनाम्यावर सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, बाजनघाटे व ढोकणे यांचे शेत क्रमांक मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ७५ व ६० वरील पंचनामे एकाच जागेचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पंच कोल्हे व टेकाम यांचे आधार कार्ड जोडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ७५ व ६० वरील पंचनामे मी कार्यालयात बसून लिहिले. हे

म्हणणे खरे आहे की, सरकारतर्फे घटनास्थळाचा पंचनामा जोडलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी भनगाळा नाला आहे हे दाखवण्याकरिता सरकारतर्फे देण्यात आलेला नकाशा जोडलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, खुंटयांचे क्रमांक व गोलाई पंचनाम्यात लिहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सेंटरिंग तार व खुंटया जप्त केल्या नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वनरक्षक असल्याबाबतचे कागदपत्र तपास अधिकारीला दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.04.09 16:48:21 +0530

सावनेर,
दिनांक ०९.०४.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe